महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : एमआयएस-०१२२/प्र.क्र.२०/२०२२/३१ दिनांक - १५ मे, २०२३

**- : प्रसिद्धीपत्रक:-**

**विषय :- लिपिक टंकलेखक व कर सहायक या संवर्गांच्या टंकलेखन कौशल्य चाचणी बाबत.**
**संदर्भ :- (१) जाहिरात क्रमांक ५८/२०२२ आणि ६०/२०२२.**
**(२) आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक २४ मार्च, २०२३ रोजीचे प्रसिध्दीपत्रक.**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा-२०२१ मधील लिपिक टंकलेखक व कर सहायक या संवर्गाकरीता विहित टंकलेखन कौशल्य चाचणी दिनांक ०७ एप्रिल, २०२३ रोजी मुंबई येथील केंद्रावर आयोजित करण्यात आली होती. प्रस्तुत चाचणी दरम्यान उमेदवारांना काही तांत्रिक अडचणी उद्धवल्या असल्याचे आयोगास प्राप्त उमेदवारांच्या अभिवेदनांवरून दिसुन येते.

**२.** आयोगाकडे प्राप्त अभिवेदनाच्या आधारे प्रस्तुत टंकलेखन कौशल्य चाचणीसंदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचा आयोगाने निर्णय घेतला आहे :-

(१) दिनांक ७ एप्रिल २०२३ रोजी आयोजित टंकलेखन कौशल्य चाचणीस उपस्थित असलेल्या सर्व उमेदवारांची टंकलेखन कौशल्य चाचणी नव्याने आयोजित करण्यात येईल.

(२) प्रस्तावित टंकलेखन कौशल्य चाचणी ही आयोगाच्या समक्रमांकाच्या दिनांक ०३ एप्रिल, २०२३ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकामध्ये नमुद मानकांनुसार घेण्यात येईल.

(३) प्रस्तावित टंकलेखन कौशल्य चाचणीच्या अनुषंगाने उमेदवारांना सूचना नव्याने प्रसिध्द केल्या जातील. सदर सूचना या उमेदवारांवर बंधनकारक असतील.

(४) प्रस्तावित चाचणीस अनुपस्थित उमेदवारांचा अथवा चाचणीमध्ये अपात्र उमेदवारांचा निवडप्रक्रियेकरीता विचार करण्यात येणार नाही.

**३.** प्रस्तावित टंकलेखन कौशल्य चाचणी फक्त मुंबई येथे आयोजित करण्यात येईल. चाचणीचा दिनांक व वेळ स्वतंत्रपणे अवगत करण्यात येईल.

ठिकाण : नवी मुंबई

सह सचिव,
दक्षता, धोरण व संशोधन,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग